**जोडपत्र “अ”**

**निवडीतून माघार घेण्याची नोटिस**

फेडरल कोर्ट ऑफ ऑस्ट्रेलिया

(ऑस्ट्रेलियाचे सांघिक न्यायालय)

जनलोक क्लास ॲक्शन

कदम व इतर विरुद्ध एम.आय.आय. रिसॉर्टस ग्रूप-१ प्रा. लि. व इतर

क्यू.यू.डी. ५२८ वर्ष २०१६

**१. ही नोटिस महत्वाची का आहे?**

सुनंदा बाळकृष्ण कदम, विशाल दिलीप म्हेत्रे आणि आबासाहेब रूपनर (अर्जदार) यांनी एम.आय.आय. रिसॉर्टस ग्रूप-१ प्रा. लि., पर्ल्स इन्फ्रास्टक्चर प्रोजेक्टस् लि. (भारत), निर्मलसिंग भांगू, सुखविंदर कौर आणि गुरप्रताप सिंग (उत्तरवादी) यांच्या विरोधात ऑस्ट्रेलियाच्या सांघिक न्यायालयात कारवाईस (क्लास ॲक्शन) सुरुवात केलेली आहे. सदर क्लास ॲक्शनमध्ये सिक्युरिटिज ॲन्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) म्हणजेच भारतातील वैधानिक नियंत्रक आणि ऑस्ट्रेलियन कमिशनर ऑफ टॅक्सेशन यांचा हस्तक्षेप आहे. या नोटिशीत सदर क्लास ऑफ ॲक्शनचा उल्लेख “जनलोक क्लास ॲक्शन” असा केलेला आहे.

सेबी ने सुद्धा एक स्वतंत्र परंतु संबंधित कारवाईस क्यू.यू.डी. १४७ वर्ष २०१७ याची सुरुवात केलेली आहे ज्याच्यामध्ये याच जनलोक क्लास ॲक्शन या विषयाचा समावेश आहे ज्याचा उल्लेख सदर नोटिशीत सेबी कार्यवाही असा केलेला आहे.

जनलोक क्लास ॲक्शन आणि सेबी प्रोसिडिंग्ज या सर्वांची सुनावणी दिनांक ५ फेब्रूवारी २०१८ रोजी ठेवण्यात आलेली आहे.

पी.ए.सी.एल. लि. सोबत पैसा गुंतवून भारतात जमीन खरेदी करण्यासाठी त्याचा अनधिकृतपणे उपयोग केलेला आहे याच विषयाशी सदर क्लास ॲक्शनचा संबंध

आहे. प्रामुख्याने सदर क्लास ॲक्शन ऑस्ट्रेलियाला त्या पैशापैकी मिळकत खरेदी करण्यासाठी काही पैसा पाठविण्यात आला त्याच्याशी संबंधित आहे.

सदर सांघिक न्यायालयाने असा आदेश दिला आहे की जे लोक या प्रकारात सहभागी असतील त्यांच्या माहितीसाठी ही नोटिस प्रकाशित केली जावी. आपण सुद्धा सदर कारवाईशी संबंधित असू शकता. म्हणून आपण सदर नोटिस काळजीपूर्वक वाचावी. आपल्यापुढे या नोटिशीच्या संदर्भात कोणताही प्रश्न असेल तर तो न्यायालयाकडे नेऊ नये. जर यामध्ये असे काही आढळले की जे आपणास समजत नाही तर आपण कायदेशीर सल्लागाराचा सल्ला घ्यावा.

## २. क्लास ॲक्शन म्हणजे नेमके काय ?

सदर क्लास ॲक्शन ही एका व्यक्तिने किंवा अनेक व्यक्तिंनी त्यांच्या व इतर अनेक सदस्य व्यक्तिंच्या वतीने एक किंवा अनेक व्यक्तिंच्या विरोधात सुरु केलेली आहे. विशिष्ट समूहाच्या सदस्यांच्या वतीने अर्जदार यांनी सदर कारवाई सुरु केलेली आहे कारण उत्तरवादी यांच्या विरोधात त्यांचा दावाही त्याच प्रकारचा आहे.

सदर क्लास ॲक्शन च्या बाबतीत सदर कारवाई चालविण्यासाठी सदस्य लोक होणाऱ्या कायदेशीर खर्चासाठी जबाबदार नसतील. सदर क्लास ॲक्शनमध्ये खर्चासाठी केवळ अर्जदार हेच जबाबदार असतील.

क्लास सदस्यांनी जर कारवाई करण्याची निवड केली असेल तर ते सदर क्लास ॲक्शनमधून जे काही निष्पन्न होईल त्याच्याशी बांधिल असतील. हे क्लास सदस्य दोन प्रकारे बांधले जातील. पहिल्या प्रकारात जर निकालपत्र पारित करण्यात आले व त्यानंतर कारवाई चालणार असेल व दुसऱ्या प्रकारात कोणत्याही वेळी एखादा समझोता होणार असेल.

जर सदर क्लास ॲक्शनमध्ये निकाल देण्यात आला किंवा काही समझोता घडून आला तर क्लास सदस्यांना आपला तोच दावा पुढे नेता येणार नाही व उत्तरवादी यांच्याविरोधात तो दावा अथवा मागणी करता येणार नाही.

जर आपणास असे वाटत असेल की एखाद्या उत्तरवादीविरुद्ध अनेक उत्तरवादींविरुद्ध वैयक्तिक दावा आहे (जो जनलोक क्लास ॲक्शनपासून भिन्न असेल) किंवा इतर अतिरिक्त दावा असेल तर आपणास निवड करण्यासाठी निर्धारित केलेली कालमर्यादा संपण्याअगोदर क्लास ॲक्शनच्या परिणामाविषयी आपण स्वतंत्रपणे कायद्याचा सल्ला घ्यावा.

## ३. जनलोक क्लास ॲक्शन म्हणजे काय?

सदर जनलोक क्लास ॲक्शन सुनंदा बाळकृष्ण कदम, विशाल दिलीप म्हेत्रे आणि आबासाहेब रूपनर यापैकी प्रत्येकांनी त्यांच्या वतीने तसेच नियमावलीत स्पष्ट केल्यानुसार क्लास सदस्य असलेल्यांच्या वतीने सुरु केलेली एक कारवाई आहे.

ऑस्ट्रेलियाच्या सांघिक न्यायालयासमोर सादर केलेल्या क्यू.यू.डी. ५२८ वर्ष २०१६ च्या सुधारित दाव्याच्या कारवाईत अर्जदार यांनी आरोप केलेले आहेत. त्यांनी असे आरोप केले आहेत की सन १९९४ पासून २०१४ पर्यंत निर्मलसिंग भांगू यांनी नोंदणी न केलेली एक गुंतवणुकीची योजना संचालित केली जी एक कायदेशीर योजना व्हायला हवी होती ज्यानुसार पी.ए.सी.एल. लि. भारतात जमीन खरेदी करुन ती विकसित करीत होते आणि भारतातील गुंतवणूकदारांना जमीनीचे प्लॉट्स विकत होते. अर्जदार यांनी असा आरोप केला आहे की सदर योजना कपटपूर्ण अशी होती.

उपलब्ध झालेल्या सुमारे १३३ दशलक्ष ऑस्ट्रेलियन डॉलर्स एवढी रक्कम पी.ए.सी.एल. लि. यांनी भारतात असलेल्या पर्ल इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट्स लि. (पी.आय.पी.एल.) यांच्याकडे हस्तांतरित केली. पुढे तीच रक्कम ऑस्ट्रेलियामधील

बँकेत असलेल्या खात्यामध्ये हस्तांतरित केली. जेथे तिचा विनियोग अनधिकृत हेतूंसाठी करण्यात आला.

अर्जदार असा दावा करतात की एका कपटपूर्ण योजनेचा भाग म्हणून सदर हस्तांतरण करण्यात आले. वैकल्पिकपणे असेही म्हणता येईल की सदर पैसा चुकीच्या आणि अनधिकृत कामांसाठी वापरण्यात आला. अर्जदार यांनी असा दावा केला आहे की ते आणि इतर क्लास सदस्य यांनी पी.ए.सी.एल. लि. कडे गुंतविलेल्या पैशाच्या बाबतीत फार मोठे नुकसान झाले आहे. म्हणून अर्जदारांनी अशी मागणी केली आहे की त्यांचा व इतर क्लास सदस्यांचा हा पैसा त्यांना परत दिला जावा. उत्तरवादी यांनी हे सर्व आरोप फेटाळले आहेत आणि ते क्लास ॲक्शनला सामोरे जात आहेत. या क्लास ॲक्शनमध्ये सेबी आणि ऑस्ट्रेलियन कमिशनर ऑफ टॅक्सेशन हे हस्तक्षेप करणार आहेत.

**सेबी ने आणलेले इतर दावे :**

मार्च २०१७ मध्ये सिक्युरिटिज ॲन्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) यांनी सेबी प्रोसिडिंग सुरु केले. जनलोक क्लास ॲक्शन आणि सेबी प्रोसिडिंग हे दोन्ही भिन्न आहेत परंतु ते एकमेकांशी संबंधित आहेत. दिनांक ५ फेब्रूवारी २०१७ रोजी या दोन्ही दाव्यांची एकत्रित सुनावणी करण्याचे योजिलेले आहे. जनलोक क्लास ॲक्शनमध्ये सेबी कडून सुद्धा हस्तक्षेप अपेक्षित आहे.

यामध्ये सेबी यांनी असे कथन केले आहे की पी.ए.सी.एल. लि. मध्ये तसेच इतर तत्सम कंपन्यांमध्ये गुंतवणूक केलेल्या भारतातील ५८.५ दशलक्ष गुंतवणूकदारांच्या वतीने (यामध्ये जनलोक क्लास एक्शनमध्ये समाविष्ट असलेल्या गुंतणूकदारांचाही समावेश होतो) ते काम करीत आहेत व पी.ए.सी.एल. लि. कडून ऑस्ट्रेलिया कडे हस्तांतरित करण्यात आलेला संपूर्ण निधी परत आणण्याच्या दृष्टीने काम करीत आहेत. (यामध्ये त्या पैशाने विकत घेतलेली मिळकत विकून आलेला पैसा सुद्धा समाविष्ट आहे).

अर्जदार यांनी असे कथन केले आहे की सेबी प्रोसिडिंग सुरु करण्याबाबत सेबी यांच्याकडे कोणतेही स्थायी शीर्ष नाही. जनलोक क्लास ॲक्शन आणि सेबी प्रोसिडिंग च्या संदर्भात सेबीला असलेल्या अधिकाराबाबत सध्या न्यायालयासमोर केस सुरु आहे. डिस्ट्रिक्ट रजिस्ट्री ऑफ फेडरल कोर्ट (सांघित न्यायालय) यांच्याशी संपर्क करुन आवश्यक ती निर्धारित फी देऊन आपणास सेबी प्रोसिडिंगच्या संदर्भातील न्यायालयीन दस्तऐवजांच्या प्रती मिळवता येतील. संपर्क करण्यासाठी आवश्क विवरण www.fedcourt.gov.au या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

## ४. सदर माघार घेणे म्हणजे काय?

सदर क्लास ॲक्शनच्या अर्जदारांनी त्यांच्या वतीने सदर क्लास ॲक्शनसाठी क्लास सदस्यांची परवानगी मिळवण्याची किंवा विशिष्ट क्लास सदस्य ठरविण्याची आवश्यकता नाही. अर्थात क्लास सदस्य सदर क्लास ॲक्शन मधून माघार घेऊन आपले क्लास सदस्यत्व संपुष्टात आणू शकतात. क्लास सदस्य कशा प्रकारे माघार घेऊ शकतील याबाबत पुढे स्पष्टीकरण दिलेले आहे. त्याचे शीर्षक आहे “आपण कशा प्रकारे कारवाईतून माघार घऊ शकता?”.

## ५. आपण क्लास सदस्य आहात काय?

जर आपण जनलोक प्रतिष्ठान पुणे भारत यांचे प्रचलित सदस्य असाल किंवा आपण शाईन लॉयर्स यांच्याबरोबर काही शर्तीवर सदर कारवाईच्या संदर्भात दिनांक १३ जुलै २०१६ पूर्वी खर्चाचा करार केला असेल तर आपण सुद्धा दिनांक १३ जुलै २०१६ रोजी एक क्लास सदस्य आहात.

आपण क्लास सदस्य आहात अथवा नाही याबाबत आपणास काही संभ्रम असेल तर आपण शाईन लॉयर्स यांच्याबरोबर संपर्क करावा (त्यांची माहिती खाली दिलेली आहे) किंवा आपण स्वत: कायदेशीर सल्ला मिळवू शकता.

**६. आपण क्लास सदस्य असल्यावर आपण कायदेशीर खर्चासाठी जबाबदार असाल काय?**

अर्जदार आणि इतर क्लास सदस्य यांच्यासमोर असलेल्या प्रश्नांची सोडवणूक न्यायालयामार्फत होण्याच्या दृष्टीने आपण केवळ जनलोक क्लास ॲक्शनमध्ये क्लास सदस्य आहात म्हणून कोणत्याही कायदेशीर खर्चासाठी जबाबदार आपण ठरणार नाही. तथापि या प्रकरणाबाबत जर आपला स्वत:चा काही वैयक्तिक दावा असेल तर आपण शाईन लॉयर्स किंवा आपल्यासाठी काम करणाऱ्या अन्य लॉयर्सशी संपर्क करु शकता. शाईन लॉयर्स यांच्याशी संपर्क करण्यासाठी आवश्यक विवरण खाली दिलेले आहे.

सदर क्लास ॲक्शनमध्ये जर एखादा आदेश पारित झाला किंवा काही समझोता घडून आला व त्याचा परिणाम म्हणून जर तुम्हाला काही रक्कम देय ठरत असेल तर त्या संदर्भात न्यायालय असाही आदेश करु शकतील की त्या पैशामधून अर्जदार यांनी क्लास ॲक्शन चालविण्यासाठी केलेल्या खर्चाची पूर्तता केली जावी जो उत्तरवादी यांच्याकडून परत मिळण्याची शक्यता नाही. अशा प्रकारच्या क्लास ॲक्शन्स या अनेकदा न्यायालयाबाहेरच समझोत्याद्वारे सोडविल्या जातात. जर असे घडले तर मग निघालेल्या तोडग्याच्या रकमेतून आपणही आपल्या हिश्श्यासाठी कोणताही वकील न लावता दावा करु शकता.

**७. जर आपण क्लास सदस्य म्हणून राहण्याचा विकल्प निवडला तर काय होईल?**

जोपर्यंत आपण माघार घेत नाही तोपर्यंत जनलोक क्लास ॲक्शनमध्ये न्यायालयाकडून सुचविण्यात आलेल्या तोडग्यासाठी अथवा पारित केल्या निकालपत्रासाठी आपणही बांधिल असाल. जर सदर क्लास ॲक्शन सफल झाली तर तुम्हाला सुद्धा अर्जदार व क्लास सदस्य यांच्या हितामध्ये पारित झालेल्या आदेश, निकालपत्र अथवा तोडगा होऊन झालेल्या फायद्यामध्ये आपला हिस्सा मागण्याचा अधिकार असेल जरी आपणास फायद्यात आपला हिस्सा मिळण्यासाठी काही अटींची पूर्तता करणे बंधनकारक असेल. जर सदर ॲक्शन असफल ठरली

किंवा आपल्या अपेक्षेनुसार सफल झाली नाही तर मग आपणाला आपला दावा पुढे नेता येणार नाही तसेच उत्तरवादी यांच्या विरोधात इतर कायदेशीर कारवाईत आपणास याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.

## ८. क्लास सदस्यांनी काय करणे अपेक्षित आहे?

### a. आपण क्लास सदस्य कसे राहू शकता ?

जर आपण क्लास सदस्य म्हणून पुढे सुद्धा राहू इच्छित आहात तर आपणास सध्या आपणास विशेष असे काही करायची आवश्यकता नाही. आपल्या वतीने अर्जदार न्यायालयात तोपर्यंत सदर कारवाई सुरु ठेवतील जेंव्हा न्यायालय सर्वांच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या प्रश्नांवर काही निर्णय घेईल. त्यावेळी आपणास भविष्यकाळात पुढील नोटिसेस मिळण्यासाठी आपण खाली दिलेल्या क्रमांकांच्या सहाय्याने शाईन लॉयर्स यांच्याशी संपर्क करु शकता.

### b. आपण सदर क्लास ॲक्शनमधून माघार कशा प्रकारे घेऊ शकता?

जर आपणास क्लास सदस्य या नात्याने पुढे चालायचे नाहीय तर आपण सदर क्लास ॲक्शनमधून माघार घेऊ शकता. जर आपण माघार घेण्याचा विकल्प निवडला तर आपण सदर कारवाईत न्यायालयाकडून पारित होणाऱ्या कोणत्याही आदेशाच्या फायद्यात हिस्सेदार असणार नाही किंवा काही समझोता घडला तर त्यातून मिळणाऱ्या लाभातही आपला कोणताही हिस्सा असणार नाही. परंतु जोपर्यंत सेबी प्रोसिडिंग सुरु आहे त्याबाबतीत सेबी यांनी असे आश्वासन दिले आहे की सदर कारवाईत ते भारतातील सर्व गुंतणुकदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत ज्यामध्ये आपल्या हिताचाही समावेश होतो. दोन्ही प्रोसिडिंगमधील घटकांची सुनावणी न्यायालयाकडून फेब्रूवारी २०१८ मध्ये होणार आहे.

जर आपण जनलोक क्लास ॲक्शन मधून माघार घेण्याचा निर्णय घेतला तर आपण सदर उत्तरवादींच्या विरुद्ध आपला स्वत:चा दावा करु शकता अर्थात यासाठी आपणास आपल्या दाव्याच्या अनुषंगाने निर्धारित कालावधित न्यायालयिन प्रक्रिया सुरु करावी लागेल. जर सदर उत्तरवादी यांच्या विरुद्ध आपली स्वत:चा दावा पुढे नेण्याची इच्छा असेल तर मग माघार घेण्याअगोदर निर्धारित कालावधित आपल्या दाव्याच्या संदर्भात आपणास स्वत:च आवश्यक कायदेशीर सल्ला मिळवावा लागेल.

जर आपणास क्लास ॲक्शनमधून माघार घ्यायची असेल तर आपण पुढे दिलेल्या न्यायालयाद्वारे मान्य नमूना २१ मध्ये “क्लास सदस्याद्वारे माघारीची नोटिस” पाठवावी लागेल. त्यानंतर ती रजिस्ट्रार ऑफ फेडरल कोर्ट ऑफ ऑस्ट्रेलिया यांच्याकडे फार्मवर दिलेल्या पत्त्यावर पाठवून द्यावी लागेल.

**महत्वाचे** : सदर नोटिस रजिस्ट्रार यांच्याकडे दिनांक २२ नोव्हेंबर २०१७ रोजी दुपारच्या ४.३० वाजेच्या आत पोहोचणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास तिचा काहीच उपयोग होणार नाही.

आपण क्लास सदस्य म्हणून माघार घेण्याची नोटिस पाठवणे आवश्क आहे जर :

i. आपणाजवळ क्लास सदस्य असण्याची अर्हता आहे आणि आपली सदर क्लास ॲक्शनमधून माघार घेण्याची इच्छा आहे.

ii. आपली खात्री असेल की चुकीच्या पद्धतीने आपणास क्लास सदस्य ठरविण्यात आलेले आहे कारण क्लास सदस्य म्हणून निर्धारित करण्यात आलेल्या अटींची आपण पूर्तता करीत नाही.

माघार घेण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक सदस्याने स्वतंत्र फॉर्म भरुन देणे आवश्यक असेल.

**९. मर्यादा कालावधि :**

हा मर्यादा कालावधि कायद्याने निर्धारित करण्यात आलेला आहे. सदर मर्यादा कालावधि संपण्यापूर्वी जर व्यक्तिने कायदेशीर कारवाई सुरु केली नाही तर त्या व्यक्तिचा दावा करण्याचा हक्कच संपुष्टात येतो.

ज्या क्लास सदस्यांनी माघार घेतलेली नाही त्यांच्या बाबतीत या क्लास ॲक्शनमध्ये सर्व प्रकारच्या मर्यादा कालावधिला थोपविले आहे. ज्या क्षण व्यक्तिने क्लास ॲक्शनचा विकल्प निवडला त्या क्षणापासून त्यांचा कालावधि सुरु होतो. जर आपण क्लास ॲक्शनमधून माघार घेण्याची निवड केली आणि आपल्या दाव्याच्या बाबतीत निर्धारित असलेला कायदेशीर मर्यादा कालावधि संपत असेल किंवा संपलेला दिसून येत असेल कारण आपण सदर क्लास ॲक्शनमध्ये येत नसाल तर आपणास उत्तरवादी यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई करण्याचा हक्क उरणार नाही.

**१०. संबंधित दस्तऐवजांच्या प्रति आपण कोठून मिळवू शकता ?**

क्लास ॲक्शन आणि सेबी प्रोसिडिंग या दोन्ही प्रकारांमध्ये संबंधित कागदपत्रे दाखल करण्यात आलेली आहेत. आपणास या संदर्भात आवश्यक असलेले निरनिराळे दस्तऐवज उदा. जनलोक क्लास ॲक्शनमधील सुधारित प्रारंभिक अर्ज, सेबी प्रसिडिंग मधील प्रारंभिक अर्ज, जनलोक क्लास ॲक्शनमधील दाव्याचे सुधारित विवरण, सेबी प्रोसिडिंगमधील दाव्याचे विवरण, एम.आय.आय. रिसॉर्टस ग्रूप-१ प्रा. लि. यांनी घेतलेला बचाव, सेबीने सदर बचावाला दिलेले उत्तर तसेच सुखविंदर कौर व गुरुप्रताप सिंग यांनी दाखल केलेला बचाव इ. च्या प्रती आपणास पुढील प्रकारे मिळू शकतील :

a. शाईन लॉयर्स यांच्या पुढील वेबसाईटवरुन डाऊनलोड करणे http://www.shine.com.au/service/class-action/pearls-ponzi-scheme/ किंवा

b. फोन क्र. ०२०-६५२७२७३७ वर कॉल करुन अपॉईंटमेंट ठरवून सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत ऑफिस नं. ४०, चौरंग स्मितशिल्प, मांजरी रोड, महादेव नगर, हडपसर, पुणे-४१२३०७ या पत्त्यावर त्यांची पाहणी करता येईल.

सदर प्रकरण काळजीपूर्वक हाताळणे आवश्यक आहे. जर यामध्ये असे काही असेल ज्याबाबत आपणास शाश्वती वाटत नसेल तर आपण अर्जदार यांचे वकील शाईन लॉयर्स यांच्याशी त्यांच्या http://www.shine.com.au/service/class-action/pearls-ponzi-scheme/ या वेबसाईट द्वारे संपर्क करु शकता किंवा +६१ ७ ३८३७ ८४१५ या क्रमांकावर फोन करुन आपण हवा तो सल्ला उपलब्ध करुन घेऊ शकता. आपला निर्णय घेण्यात विलंब करु नका.

फॉर्म २१

नियम ९.३४

**माघार घेण्याची नोटिस**

क्र. क्यू.यू.डी.५२८ वर्ष २०१६

फेडरल कोर्ट ऑफ ऑस्ट्रेलिया

डिस्ट्रिक्ट रजिस्ट्री क्विन्सलॅन्ड

डिव्हिजन : जनरल

सुनंदा बाळकृष्ण कदम व इतर .. अर्जदार

एम.आय.आय. रिसॉर्टस ग्रूप-१ प्रा. लि. व इतर .. उत्तरवादी

प्रति:

दि रजिस्ट्रार

फेडरल कोर्ट ऑफ ऑस्ट्रेलिया

क्विन्सलॅन्ड डिस्ट्रिक्ट रजिस्ट्री

हॅरी गिब्ज कॉमनवेल्थ लॉ कोर्टस् बिल्डिंग

११९ नॉर्थ क्वे (सीएनआर टॅन्क स्ट्रिट)

ब्रिस्बेन-४०००

क्लास चे नांव

सदस्य ________________________________________ सदर क्लास ॲक्शन मध्ये क्लास सदस्य आहे. सदर क्लास सदस्य फेडरल कोर्ट ऑफ ऑस्ट्रेलिया ॲक्ट १९७६ च्या कलम ३३जे अन्वये नोटिस देत आहेत की ते क्लास सदस्य _____________ या नात्याने या क्लास ॲक्शन मधून माघार घेत आहेत.

दिनांक : _____

सही ________

नांव

दर्जा [उदा. क्लास सदस्य किंवा क्लास सदस्याचे लॉयर ]

ज्यांच्या वतीने दाखल केले आहे त्यांचे नांव व त्यांचा सहभाग ______________

तयार करणाऱ्या व्यक्तिचे/लॉयरचे नांव ________________

लॉ फर्म (लागू असल्यास) ____________

टेलिफोन __________________ फॅक्स _____________

इ मेल _________________________

पत्रव्यवहाराचा पत्ता

(राज्य आणि पिनकोड क्रमांक लिहिणे)

[स्वरुप २ फॉर्म स्वीकृती ९/१०/१३]